।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४३

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारूती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि ५ एप्रिल २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक १४ वा

# पोलीस निरीक्षक व अन्य कर्मचाऱ्यांकडून ॲड.सागर मेटकरी यांना मारहाण, शिवीगाळ व धमकी

## सांगोला बार असोसिएशनकडून पोलिसां विरोधात कारवाईची मागणी

## पोलिस निरिक्षक विनोद घुगे यांच्यावर कारवाईसाठी लढा सुरूच ठेवणार : ॲड.मिलिंद थोबडे

सांगोला : सांगोला येथील बार असोसिएशनचे सदस्य ॲड. सागर बंडू मेटकरी यांना पोलीस निरीक्षक विनोद घुगे व इतर कर्मचाऱ्यांनी शिवीगाळ करून मारहाण केली तसेच खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेच्या निषेधार्थ सांगोला बार असोसिएशनकडून गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी निवेदन देऊन संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.



ॲड. सागर मेटकरी (रा. चांडोलेवाडी, ता. सांगोला) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. ३१ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ९.३० वाजता त्यांच्या नातेवाईक रावसाहेब मेटकरी यांनी त्यांना सांगोला पोलीस ठाण्यात बोलावले होते. ते पोलीस स्टेशनच्या आवारात उभे असताना पोलीस निरीक्षक विनोद घुगे व अन्य ५ ते ६ कर्मचारी त्यांच्या जवळ आले. तू येथे कशाला आला आहेस? असे विचारले त्यावर मेटकरी यांनी आपण वकील असून नातेवाईकावरील गुन्ह्याबाबत चौकशीसाठी आल्याचे सांगितले. यावर पोलीस निरीक्षकांनी संतप्त होत ते कोर्टात बघायचे, येथे येऊ नकोस असे म्हणत त्यांच्या कानशिलात मारल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर शिवीगाळ करत कॉलरला धरून त्यांना पोलीस स्टेशनमधील एका खोलीत नेऊन पुन्हा मारहाण करण्यात आली. तसेच त्यांचा मोबाईल फोन जबरदस्तीने काढून घेतला गेला आणि रात्री सुमारे १.३० वाजेपर्यंत त्यांना पोलीस ठाण्यात बसवून ठेवण्यात आले.ॲड.सागर मेटकरी यांच्या म्हणण्यानुसार, या प्रकरणाची तक्रार करू नकोस, अन्यथा ह्या केसमध्ये गुंतवून जेलमध्ये सडविलेशिवाय राहणार नाही, अशी धमकी दिली तसेच त्यांनी माझेकडून कोऱ्या कागदावर सही घेण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

या घटनेबाबत ॲड. मेटकरी यांनी दि. १ एप्रिल रोजी सांगोला बार असोसिएशनच्या अध्यक्षांकडे लेखी तक्रार दिली होती. त्यानुसार २ एप्रिल रोजी तातडीची बैठक बोलावण्यात आली. बैठकीत या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत संबंधित पोलीस निरीक्षक व कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. बार असोसिएशनच्या निवेदनात संबंधितांवर तात्काळ व कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली असून यावेळी सर्व पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

या निवेदनाच्या प्रती जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी मंगळवेढा यांना देण्यात आल्या आहेत.

**वकील मारहाण प्रकरणाचे राज्यभरात पडसाद; तीन जिल्ह्यातील वकिलांचे कामबंद आंदोलन....**

सांगोला येथील ॲड. सागर मेटकरी यांना झालेल्या मारहाणी बाबत पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी सुरू असणारा लढा आपण सुरूच ठेवणार आहे. गरज पडल्यास त्यांच्याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेऊ असे प्रतिपादन महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष ॲड. मिलिंद थोबडे यांनी केले.

पोलीस निरीक्षक घुगे यांच्यावर कारवाई व्हावी या मागणीसाठी सलग तिसऱ्या दिवशी सांगोला येथील विधिज्ञ संघटनेने कामबंद आंदोलन केले.

या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शनिवार, ४ एप्रिल रोजी ॲड. थोबडे सांगोला येथे आले होते. यावेळी सांगली विधीज्ञ संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रमोद भोकरे, कराडचे ॲड. विजय पाटील, पुण्याच्या अध्यक्षा ॲड. वनमाला अनुसे, पंढरपूरचे अध्यक्ष ॲड. विकास भोसले, उपाध्यक्ष ॲड. संजय व्यवहारे, सचिव ॲड. शरद पवार, सहसचिव ॲड. गणेश चव्हाण यांनीही सांगोला येथील आपल्या वकील बांधवांना पाठिंबा देत पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली.

**·अन्यथा खासगी तक्रार दाखल करणार.....**

ॲड. सागर मेटकरी यांना झालेली मारहाण निषेधार्ह आहे. याबाबत आम्ही सोलापूरचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांना लेखी निवेदन देऊन पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करणार आहोत. तरीही आम्हाला न्याय मिळाला नाही तर, गरज पडल्यास आम्ही विनोद घुगे यांच्याविरोधात न्यायालयात खासगी तक्रार दाखल करणार आहोत.

–ॲड. मिलिंद थोबडे,
मा. अध्यक्ष महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिल.

## सांगोला तालुक्यातील प्रलंबित जमीन मोजणी प्रकरणांना लवकरच गती आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

सांगोला : सांगोला तालुक्यात भूमी अभिलेख कार्यालयामध्ये जमीन मोजणीची प्रकरणे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. मोजणीसाठी अर्ज करूनही महिनोनमहिने प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिकांना वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत होत्या. यामुळे शेतजमिनींच्या हद्दींबाबत वाद निर्माण होऊन जमीन खरेदी–विक्री, बँक कर्ज प्रस्ताव तसेच इतर प्रशासकीय कामांमध्ये अडथळे निर्माण होत होते. या गंभीर प्रश्नाची दखल घेत सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ मध्ये कपात सूचना क्रमांक ११९५ द्वारे शासनाचे लक्ष वेधले होते. त्यांच्या ठोस व प्रभावी मांडणीमुळे शासनाने या मागणीची सकारात्मक दखल घेतली असून लवकरच त्यावर ठोस कार्यवाही होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. याअंतर्गत सांगोला तालुक्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. तसेच भूमी अभिलेख कार्यालयात आवश्यक त्या प्रमाणात कर्मचारी व तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने कामकाजाला गती मिळणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून जमीनविषयक व्यवहार अधिक पारदर्शक व सुलभ होण्यास मदत होणार आहे. नागरिकांना वारंवार कार्यालयात जावे लागण्याची गरज कमी होऊन प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सांगोला तालुक्यातील हा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल उचलले गेले आहे.

## रविवारी आठवडा बाजार दिवशी रस्त्यावर भाजीपाला विक्रीस मनाई नियमांचे पालन करण्याचे नगरपरिषदेचे आवाहन

सांगोला : शहरातील आठवडा बाजार सुरळीत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पडावा यासाठी सांगोले नगरपरिषदेकडून महत्त्वाचे सार्वजनिक आवाहन करण्यात आले आहे. रविवारी आठवडा बाजार दिवशी शेतकरी व व्यापारी भाजीपाला विक्रेत्यांनी रस्त्यावरती भाजीपाला विक्री करू नये, असे स्पष्ट निर्देश नगरपरिषदेमार्फत देण्यात आले आहेत. नगरपरिषद प्रशासनाने सांगितले की, आठवडा बाजार आवारात पत्राशेड व परिसरामध्ये भरपूर जागा उपलब्ध असून सर्व विक्रेत्यांसाठी तेथे बसण्याची योग्य व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे कोणत्याही विक्रेत्यांनी रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी बसून विक्री करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांशी कोणत्याही प्रकारचा वाद–विवाद किंवा हुज्जत घालू नये, असेही नागरिकांना व विक्रेत्यांना बजावण्यात आले आहे. आठवडा बाजार आवारामध्ये दुचाकी व चारचाकी वाहने आतमध्ये घेऊन जाण्यास मनाई करण्यात आली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची वाहने पोलीस स्टेशनला जमा करण्यात येतील, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. याशिवाय भीमनगरसमोरील रस्त्यावर कोणत्याही व्यापाऱ्याने बसू नये, कारण सदरची जागा दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी पार्किंग म्हणून वापरण्यात येणार असल्याचे नगरपरिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे. रविवारी आठवडा बाजार याठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून मोबाईल चोरीचे प्रमाण वाढल्याचे दिसते. तसेच रस्त्यावर भाजीपाला, फळविक्रेते बसत असून त्याठिकाणी गाडी पार्किंगलाही अडथळा निर्माण होत आहे. नगरपरिषद प्रशासनाने सर्व नागरिक, शेतकरी व व्यापाऱ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन लोकनियुक्त नगराध्यक्ष श्री. आनंदा गोरख माने व मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी केले आहे.

## सांगोला पोलीसांकडून परप्रांतीय मोबाईल चोरट्यास अटक

## 30 लाख रुपयांचे मोबाईल केले हस्तगत

सांगोला : वासुद चौक येथील सुर्योदय मोबाईल शॉपी फोडून लाखो रुपयांच्या मोबाईलची चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात सांगोला पोलिसांना यश आले आहे. कर्नाटकातील बागलकोट येथून एका आरोपीस अटक करून त्याच्याकडून तब्बल २० मोबाईल जप्त करण्यात आले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी दिली.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २३ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे १.१८ वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी सूर्योदय मोबाईल शॉपी या दुकानाच्या वरचा पत्रा उचकटून सुमारे ३ लाख ९० हजार ५०० रुपयांचे विविध कंपनीचे मोबाईल फोन लंपास करण्यात आले होते. याप्रकरणी सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.


दरम्यान, सायबर तंत्रज्ञानाच्या मदतीने पोलिसांनी चोरीस गेलेल्या मोबाईलपैकी एक मोबाईल ट्रेस केला. त्याच्या आधारे तपासाची दिशा स्पष्ट झाली आणि पोलिसांनी थेट कर्नाटक राज्यातील बागलकोट येथे धाड टाकली. या कारवाईत अक्षय शांताराम इंदुलकर (वय ३६, रा. नवनगर, बागलकोट) याला अटक करण्यात आली. आरोपीकडून एकूण २० मोबाईल फोन जप्त करण्यात आले असून, त्यांची अंदाजे किंमत ३ लाख ३० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे (मंगळवेढा विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

या कारवाईत पोहेकॉं दत्ता वजाळे, पोलिस हेडकॉन्स्टेबल विशाल भोसले, पोलिस कॉन्स्टेबल शहाजहान शेख तसेच सायबर पोलीस ठाण्याचे पोलिस कॉन्स्टेबल राहुल सोनकर यांनी विशेष भूमिका बजावली.

# मुक्त विचार

## विचारधन



"कल्पनाशक्ती ही ज्ञानापेक्षा अधिक महत्त्वाची आहे, कारण ज्ञान मर्यादित आहे, तर कल्पनाशक्ती संपूर्ण जगाला कवेत घेते.

-अलबर्ट आईन्स्टाईन

## उशिरा का होईना, न्यायाचा विजय: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'भारतरत्न' आणि समाजाच्या कृतज्ञतेची कहाणी

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात काही क्षण असे असतात, जे केवळ घटनांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर ते एका युगाच्या मनोवृत्तीचे, संघर्षाचे आणि न्यायाच्या आकांक्षेचे प्रतीक ठरतात. १४ एप्रिल १९९० हा दिवस तसाच एक ऐतिहासिक क्षण ठरला, ज्या दिवशी भारताने आपल्या महान पुत्राला, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविले. हा केवळ पुरस्कार नव्हता; तो एका दीर्घ सामाजिक संघर्षाचा, उपेक्षेच्या वेदनेचा आणि न्यायाच्या लढ्याचा सन्मान होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व आणि कार्य इतके व्यापक आहे की त्यांचे मूल्यमापन एका सन्मानाच्या चौकटीत बसवणे अशक्य आहे. त्यांनी केवळ राज्यघटना लिहिली नाही, तर त्या राज्यघटनेतून भारताच्या आत्म्याला आकार दिला. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांची बीजे त्यांनी भारतीय समाजाच्या मातीमध्ये पेरली. परंतु या महान कार्याचा सन्मान मिळवण्यासाठी त्यांना आणि त्यांच्या अनुयायांना अनेक दशके प्रतीक्षा करावी लागली, ही वस्तुस्थिती आपल्या समाजातील विसंगती आणि दुर्लक्षाची साक्ष देते.

भारतरत्न जाहीर होण्याचा निर्णय ३१ मार्च १९९० रोजी झाला आणि १४ एप्रिल त्यांच्या जयंतीदिनी तो सन्मान प्रदान करण्यात आला. हा योगायोग नव्हता, तर एक प्रतीकात्मक संदेश होता. या निर्णयामागे केवळ सरकारचा विचार नव्हता; त्यामागे लाखो अनुयायांची भावना, आंदोलनांची ताकद आणि सामाजिक न्यायासाठी उभ्या राहिलेल्या चळवळींचा दबाव होता. बाबासाहेबांना भारतरत्न मिळावे, ही मागणी केवळ भावनिक नव्हती, तर ती ऐतिहासिक न्यायाची मागणी होती. याहूनही महत्त्वाची बाब म्हणजे हा सन्मान त्यांच्या पश्चात देण्यात आला. ज्या व्यक्तीने जिवंतपणीच आपल्या कार्याने देशाला घडवले, त्याला मृत्यूनंतर मान्यता मिळणे हे आपल्या व्यवस्थेच्या संथ गतीचे द्योतक आहे. हा उशीर केवळ प्रशासनाचा नव्हता; तो समाजाच्या सामूहिक जाणिवेतील उशीर होता. आपण बाबासाहेबांना वाचण्यात, समजून घेण्यात आणि त्यांचे विचार आत्मसात करण्यात उशीर केला आणि त्याचाच परिपाक म्हणजे हा उशिराचा सन्मान.

डॉ. आंबेडकरांचे कार्य केवळ दलितांच्या हक्कांपुरते मर्यादित नव्हते. त्यांनी भारतीय समाजाच्या सर्व स्तरांमध्ये समतेची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. महिलांचे अधिकार, कामगारांचे प्रश्न, आर्थिक विषमता या सर्व मुद्द्यांवर त्यांनी स्पष्ट आणि ठोस भूमिका घेतली. त्यामुळे त्यांना दिलेला भारतरत्न हा केवळ एका समाजाचा सन्मान नाही, तर तो संपूर्ण भारताच्या प्रगतीचा सन्मान आहे.

आज या सन्मानाच्या तीन दशकांहून अधिक काळानंतर, आपण स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा. आपण बाबासाहेबांच्या विचारांना कितपत न्याय दिला? संविधानात दिलेले अधिकार आणि मूल्ये आपण प्रत्यक्षात जगतो का? जातीय भेदभाव, सामाजिक विषमता आणि अन्याय अजूनही आपल्या समाजात अस्तित्वात आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. मग भारतरत्न देऊन आपण आपले कर्तव्य पूर्ण केले का? खरे पाहता, बाबासाहेबांना दिलेला सन्मान हा त्यांच्या कार्याचा शेवट नाही, तर तो आपल्या जबाबदारीची सुरुवात आहे. त्यांचे विचार केवळ ग्रंथांमध्ये मर्यादित न राहता, ते आपल्या आचार-विचारांमध्ये उतरले पाहिजेत. सामाजिक न्याय हा केवळ सरकारी योजना किंवा घोषणांमधून येत नाही; तो समाजाच्या प्रत्येक घटकाच्या वर्तनातून निर्माण होतो.

आजच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीकडे पाहिले तर बाबासाहेबांचे विचार अधिकच महत्त्वाचे वाटतात. धर्म, जात, भाषा या आधारांवर होणारे विभाजन, द्वेषाची वाढती प्रवृत्ती आणि असहिष्णुता या सर्व गोष्टी त्यांच्या विचारांच्या विरोधात आहेत. अशा परिस्थितीत, भारतरत्न हा केवळ एक सन्मान नसून, तो एक स्मरणपत्र आहे. आपल्या मार्गदर्शनासाठी व आपल्या चुका दाखवण्यासाठी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी एकदा म्हटले होते, संविधान कितीही चांगले असले, तरी ते चालवणारे लोक चांगले नसतील, तर ते निष्फळ ठरेल. ही वाक्ये आजही तितकीच लागू आहेत. आपण संविधानाचा आदर करतो का? आपण त्यातील मूल्यांचे पालन करतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधणे हीच बाबासाहेबांना खरी श्रद्धांजली ठरेल. भारतरत्न हा सन्मान उशिरा मिळाला, ही खंत कायम राहील. पण त्याहून मोठी गोष्ट म्हणजे, तो सन्मान मिळाल्यानंतर आपण काय केले? आपण बाबासाहेबांना केवळ प्रतीक म्हणून वापरतो आहोत का, की त्यांच्या विचारांना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करतो आहोत? हा आत्मपरीक्षणाचा क्षण आहे.

आज गरज आहे ती बाबासाहेबांना पुन्हा एकदा वाचण्याची, समजून घेण्याची आणि त्यांच्या विचारांना आचरणात आणण्याची. भारतरत्न हा त्यांच्या कार्याचा गौरव आहे, पण तो आपल्या जबाबदारीची आठवणही आहे. तो आपल्याला सांगतो समता, न्याय आणि बंधुता ही केवळ शब्द नाहीत; ती आपल्या समाजाची पायाभूत तत्त्वे आहेत. शेवटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिलेला भारतरत्न हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नाही, तर तो भारतीय लोकशाहीच्या आत्म्याचा सन्मान आहे. तो त्या विचारांचा सन्मान आहे, ज्यांनी भारताला एक प्रगत, समतावादी आणि न्याय्य राष्ट्र बनवण्याचा मार्ग दाखवला. आणि म्हणूनच, हा सन्मान केवळ भूतकाळाचा गौरव नाही, तर तो भविष्याचा मार्गदर्शक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतरत्न देऊन भारताने आपली कृतज्ञता व्यक्त केली. परंतु खरी कृतज्ञता तेव्हाच सिद्ध होईल, जेव्हा आपण त्यांच्या विचारांना आपल्या जीवनाचा भाग बनवू. तेव्हाच हा सन्मान खऱ्या अर्थाने पूर्णत्वाला जाईल.

-प्रवीण बागडे,नागपूर

## बाटलीबंद पाण्यामुळे कशी होत आहे आरोग्याची हानी




भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणने पॅकेज्ड पिण्याचे पाणी (बाटलीबंद पाणी) उच्च जोखमीच्या अन्न श्रेणीमध्ये समाविष्ट केले आहे. ऋड्डअख ने नवीन नियम जारी केले आहेत. त्यानुसार आता बाटलीबंद पाणी विकणाऱ्या सर्व कंपन्यांची वर्षातून एकदा तपासणी केली जाणार आहे. पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी हे काम केले जाणार आहे.आता ऋड्डअख ने बाटलीबंद पाण्याचा उच्च जोखमीच्या श्रेणीत समावेश का केला हा प्रश्न आहे. याबद्दल तज्ज्ञांकडून जाणून घेऊया.पाणी पीत आहेत, ज्यामुळे सूक्ष्म प्लास्टिक शरीरात प्रवेश करत आहे. मायक्रो प्लॅस्टिक लोकांच्या मेंदूतही शिरत आहे. त्यामुळे एफएसएसएआयने जे काही नवीन नियम केले आहेत, त्याची तातडीने अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

काही मोठ्या हॉटेलांनी काचेच्या बाटल्यांमध्ये पाणी देण्यास फार पूर्वीपासून सुरुवात केली आहे, कारण त्यांना माहित होते की बाटलीबंद पाण्यात असलेले मायक्रो प्लास्टिक शरीराला हानी पोहोचवते.पूर्वी लोक मडक्यातील पाणी प्यायचे, पण आता घरात ते मडकेही नाही. आता त्याची जागा प्लास्टिकच्या बाटल्यांनी घेतली आहे. प्लास्टिकशिवाय या बाटल्यांमध्ये इतरही अनेक धोकादायक गोष्टी आहेत, ज्या शरीराला हानी पोहोचवत आहेत.

आजकाल फक्त पाणीच नाही, तर दूधही प्लास्टिकच्या बाटल्यांमध्ये येते, त्यामुळे मायक्रो प्लास्टिक मानवी शरीरात शिरते. प्रत्येक गोष्टीतून सूक्ष्म प्लास्टिक आत येत आहे, म्हणून उचललेले हे एक चांगले पाऊल आहे. ही पायरी काटेकोरपणे राबवावी.आता लोकांना प्लॅस्टिकच्या बाटल्यांऐवजी घरात असलेले पाणी उकळून पिण्याचा सल्ला दिला जात आहे. यातून कोणतेही नुकसान नाही.खाद्यपदार्थांचे पॅकिंग कसे करावे, त्यामुळे आरोग्याला हानी पोहोचणार नाही, याकडेही लक्ष दिले पाहिजे. त्याचे परिणाम काही काळानंतर कळतील, लोकांची स्मरणशक्ती अजूनही क्षीण होत आहे. अनेक प्रकारचे आजार होत आहेत. यामुळे हृदयविकार, कॅन्सरसारखे मोठे आजार होतात. मायक्रो प्लॅस्टिकचे आरोग्यावर होणारे परिणाम यावरही अनेक प्रकारची संशोधने झाली आहेत. असे म्हटले गेले आहे की मायक्रोप्लास्टिक मेंदूला देखील हानी पोहोचवते.

## भारतातील असे गाव, जिथे लोक नावाने नव्हे, तर शिट्ट्या वाजवून बोलतात, जाणून घ्या कशी सुरु झाली ही परंपरा

वास्तविक, भारतात भेट देण्यासारखी अनेक ठिकाणे आहेत – जिथे तुम्ही कुटुंब, मित्र किंवा एकट्याने प्रवास करू शकता. पण इथे आम्ही तुम्हाला एका ठिकाणाविषयी सांगणार आहोत, ज्याबद्दल जाणून घेतल्यानंतर तुम्हीही थक्क व्हाल. खरं तर, हे एक गाव आहे आणि त्याचे नाव कोंगथोंग आहे. मेघालयची राजधानी शिलाँगपासून त्याचे अंतर सुमारे ६0 किलोमीटर आहे.येथील सर्वात मनोरंजक गोष्ट म्हणजे या गावाला 'व्हिसलिंग व्हिलेज' असेही म्हणतात. इथे लोक एकमेकांना नावाने नाही, तर शिट्टी वाजवून हाक मारतात. तुम्हाला ऐकायला थोडे विचित्र वाटेल पण हे खरे आहे. हे ठिकाण पूर्व खासीच्या टेकड्यांमध्ये वसलेले आहे. चला जाणून घेऊया या अनोख्या गावाबद्दल

कोंगथोंग गावाची परंपरा खूप अनोखी आहे. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे येथे दोन नावे असलेले लोक राहतात. एक साधे नाव आणि दुसरे सूर. धुनवाले नावाचेही दोन प्रकार आहेत – दीर्घ गाणे आणि लहान गाणे. आम्ही तुम्हाला सांगतो की पहिली धून ती असते जी आई आपल्या मुलाला देते. ही धून आपापसात संवाद साधण्यासाठी वापरली जाते.

दुसरा सूर गावातील ज्येष्ठांनी रचला आहे. ते फक्त स्वतःच वापरत नाहीत, तर ते गावातील इतर लोकांना बोलावण्यासाठी देखील वापरतात. त्यामुळे एकूणच या गावात चर्चा कमी आणि सूर जास्त ऐकायला मिळतात. इथे सकाळपासून संध्याकाळपर्यंत फक्त शिट्ट्यांचा आवाज येतो.येथील जुन्या परंपरेनुसार एकदा दोन मित्र रस्त्याने जात होते. यावेळी काही लोकांनी त्याच्यावर हल्ला केला. त्यांच्यापासून वाचण्यासाठी एक मित्र जवळच्या झाडावर चढला. त्यांना गुंडांपासून वाचवण्यासाठी एका मित्राने त्याच्या इतर मित्रांना कॉल करण्यासाठी अनेक आवाज वापरले. हा आवाज त्याच्या मित्रांना समजला आणि तो गुंडांपासून वाचला. तेव्हापासून ही परंपरा सुरू झाली.

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-२३ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता वाढवा; दिखाऊ काम नको, निकाल हवा! पदभार स्वीकारताच सभापती चेतनसिंह केदार सावंत यांचे स्पष्ट आदेश




सांगोला : जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रशासनाने तातडीने कामाला लागावे, असा कडक इशारा देत जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी पदभार स्वीकारताच शिक्षण विभागाला स्पष्ट दिशा दिली. फक्त कागदोपत्री काम नको, प्रत्यक्ष निकाल दिसला पाहिजे, अशा शब्दांत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

प्राथमिक शाळांचा पट वाढला पाहिजे, यासाठी प्रयत्न करावेत. शाळांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव पाठविण्यात यावेत. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रशासनाने प्रयत्नशील रहावे. शिक्षण क्षेत्रात नवनवीन कल्पना अंमलात आणाव्यात. आदर्श शाळा, गुणवंत विद्यार्थी व गुणवंत शिक्षकांना पाठबळ द्यावे. शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल. राज्यात नावलौकिक होईल असा शिक्षण विभागाने कारभार करावा अशा सूचना देत जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी गुरुवारी पदभार स्वीकारला.

जिल्हा परिषदेचे शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी जिल्हा परिषदेत आल्यानंतर नतमस्तक होऊन सभापती पदभार स्वीकारला. यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, सांगोला पंचायत समितीच्या सभापती पुनम इंगवले, बाळासाहेब एरंडे, जिल्हा परिषद सदस्य अतुल पवार, जिल्हा परिषद सदस्य दादासाहेब लवटे, योगेश पाटील, दत्ता जाधव, उमेश पाटील, उपसभापती अजय सरगर, युवासेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख सागर पाटील, योगेश खटकाळे, बाळासाहेब आसबे, दुर्योधन हिप्परकर, बाळासाहेब काटकर, संभाजी आलदर, पंचायत समिती सदस्य डॉ.सदाशिव दबडे, पंचायत समिती सदस्य बापू जावीर, जुबेर मुजावर,अफजल शेख, संजय केदार, सचिन देशमुख, महावीर कदम, मदन दराडे, लतिफ तांबोळी, राजेश शिंदे, अमोल कुलकर्णी, शिवराज पुकळे, नितीन मोहिते, अविनाश गोरे, डॉ.अविनाश खांडेकर,सुधीर गाडे, विशाल बनसोडे, माजी सरपंच नंदकुमार दिघे, अनिल दिघे, पोपट गडदे, दादा खरात, बाळासाहेब झपके, प्रशांत वलेकर, अनिल केदार अण्णा पाटील, प्रकाश घोडके, अंकुश आवताडे, बाळासाहेब केदार, संभाजी चव्हाण, अजित गोडसे, अमोल साखरे, राहुल केदार, यांच्यासह अनेकांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिक्षण व आरोग्य सभापती चेतनसिंह केदार सावंत यांनी शिक्षण विभागाची आढावा बैठक घेतली. यावेळी शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी शिक्षण विभागाची संपूर्ण माहिती दिली. यावेळी मार्गदर्शन करताना सभापती चेतनसिंह केदार यांनी शिक्षण विभागाचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी प्रशासनाने प्रयत्नशील राहावे. गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना दिल्या.

# सांगोल्यात आलदर हॉस्पिटलच्या वतीने मोफत बाल आरोग्य शिबिर संपन्न; ४५ चिमुकल्यांची तपासणी



सांगोला : वाढत्या उन्हाळ्याचा तडाखा आणि लहान मुलांमध्ये उद्भवणाऱ्या आरोग्य समस्या लक्षात घेता, सांगोला येथील नामांकित आलदर हॉस्पिटल (बालरुग्णालय व नवजात शिशु अतिदक्षता विभाग) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. चिंचोली रोडवरील 'लिटील मिलेनियम प्रिस्कूल' येथे पार पडलेल्या या शिबिरात ४५ बालकांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी करण्यात आली.

ग्रामीण व शहरी भागातील मुलांमध्ये वाढणारे आजार, कुपोषण आणि शारीरिक व्याधींवर वेळेत उपचार मिळावेत, या सामाजिक बांधिलकीतून हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. जन्मापासून ते १८ वर्षे वयोगटातील मुलांची या शिबिरात बालरोग तज्ज्ञांमार्फत सखोल तपासणी करण्यात आली. केवळ तपासणीच नव्हे, तर तपासणीनंतर ज्या बालकांना औषधांची गरज होती, त्यांना हॉस्पिटलच्या वतीने मोफत औषधेही वितरित करण्यात आली.

हे शिबिर 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' आणि 'प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजना' अंतर्गत राबवण्यात आले. या उपक्रमामुळे गरजू पालकांना शासकीय आरोग्य योजनांची माहिती मिळाली, ज्यामुळे भविष्यात मोठ्या उपचारांसाठी त्यांना आर्थिक भार सोसावा लागणार नाही. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. आलदर म्हणाले की मुलांचे आरोग्य हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे. सध्या उन्हाचा पारा वाढत असल्याने पालकांनी आपल्या पाल्यांच्या आहाराकडे आणि आरोग्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. मुलांच्या किरकोळ वाटणाऱ्या आजारांकडेही दुर्लक्ष न करता तातडीने तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी लिटील मिलेनियम प्रिस्कूलच्या कॅम्पस इन्चार्ज पूजा पतंगे, स्वाती मस्के, पल्लवी पांढरे, मयुरी फुले, आरझू शेख आणि योगेश कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच आलदर हॉस्पिटलचे सुनील बुरुंगे, नितीन भोसले यांच्यासह सांगोला परिसरातील बहुसंख्य पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांगोला शहरात राबवलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्वच स्तरातून आलदर हॉस्पिटलचे आणि त्यांच्या टीमचे कौतुक होत आहे.

# सांगोला विद्यामंदिरच्या उपमुख्याध्यापकपदी श्री.चारुदत्त जगताप यांची नियुक्ती



सांगोला : सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज सांगोला उपमुख्याध्यापक चिंतामणी देशपांडे यांचे सेवानिवृत्तीनंतर रिक्त झालेल्या उपमुख्याध्यापक पदावर कोळा विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचे पर्यवेक्षक चारुदत्त दिगंबर जगताप यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे.

सुरुवातीला संस्थापक अध्यक्ष गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास चारूदत्त जगताप यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपमुख्याध्यापक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी त्यांचे स्वागत व सत्कार केला. यावेळी उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासो नरूटे,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. चारूदत्त दिगंबर जगताप यांनी सांगोला विद्यामंदिर प्रशाला येथे अकरा वर्षे,नाझरा विद्यामंदिर नाझरा सोळा वर्षे सहशिक्षक व कोळा विद्यामंदिर कोळा येथे दोन वर्ष पर्यवेक्षकपदी कार्य केले आहे. आपल्या अध्यापनातून, प्रशासकीय कार्यातून तसेच क्रीडा क्षेत्रातील कार्यातून त्यांनी वेगळा ठसा उमटवला त्यामुळेच त्यांचा तालुका, जिल्हा,राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराने सन्मान झाला आहे. या नियुक्तीसाठी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला उपाध्यक्ष ॲड विजयसिंह चव्हाण,सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके,खजिनदार शंकरराव सावंत, संस्था कार्यकारिणी सदस्य शीलाकाकी झपके,विश्वेश झपके, सर्व संस्था सदस्य, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नूतन उपमुख्याध्यापक चारूदत्त जगताप यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

# वाढेगाव नदीपात्रात रोटरी क्लब व न्यू इंग्लिश स्कूलतर्फे श्रमदान वृक्ष संवर्धनासाठी 'टॅगिंग' उपक्रम; परिसराची स्वच्छता करून निसर्ग रक्षणाचा संदेश



सांगोला : येथील रोटरी क्लब सांगोला आणि न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने वाढेगाव नदीपात्रातील त्रिवेणी संगम परिसरात 'स्वच्छता अभियान व श्रमदान' उपक्रम उत्साहात राबवण्यात आला. यावेळी परिसरातील वृक्षांचे भविष्यकाळात जतन व्हावे, यासाठी त्यांना 'टॅगिंग' (नंबरिंग) करण्यात आले असून, वन विभागाच्या माध्यमातून वृक्षारोपणही करण्यात आले. वाढेगाव येथील त्रिवेणी संगमावर असलेल्या महादेव मंदिर आणि संपूर्ण परिसर रोटरीचे सदस्य आणि न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी श्रमदानातून चकाचक केला. निसर्ग संवर्धनाचा हा प्रकल्प यशस्वी करण्यासाठी रोटेरियन वैजनाथ घोंगडे व इंजिनिअर अशोक गोडसे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्रिवेणी संगम परिसराचा पालटलेला चेहरा पाहून वन अधिकारी आणि उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. या मोहिमेत रोटरी क्लबचे पदाधिकारी डॉ. अनिल कांबळे, अरविंद डोंबे गुरुजी, श्रीपती आदलिंगे, इंजिनिअर अशोक गोडसे, विजय म्हेत्रे आणि वन विभागाचे अधिकारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले होते.

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता

# नो डिजे - नो डॉल्बी: सर्वांनी नियमाचे पालन करावे; उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त सांगोल्यात शांतता कमिटीची बैठक




सांगोला : नव्याने मिरवणुकीला व नवीन मिरवणूक मार्गाला परवानगी दिली जाणार नाही. यापूर्वी ज्या मार्गाने मिरवणूक काढण्यात आली आहे तोच मार्ग राहील असे सांगत, नो डिजे – नो डॉल्बी या नियमाचे पालन करावे. ध्वनी प्रदूषण कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी. अशा सूचना उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपूजे यांनी दिल्या. सांगोला पोलिस ठाणे सोलापूर ग्रामीण यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवा निमित्ताने शांतता कमिटीची बैठक काल सोमवार दिनांक ३० मार्च रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृह येथे पार पडली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपूजे बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर तहसिलदार बाळूताई भागवत, पोलिस निरीक्षक विनोद घुगे,मुख्याधिकारी सुधीर गवळी, नगराध्यक्ष आनंदाभाऊ माने, गट नेते प्रशांत धनवजीर, नगरसेवक काशिलिंग बाबू गावडे, ज्ञानेश्वर माऊली तेली, अरुण पाटील, राजाभाऊ मदने, विवेक पाटील यांच्यासह तालुक्यातील विविध गावचे पोलीस पाटील, भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपूजे पुढे म्हणाले, कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होणार नाही याची काळजी घेऊन जयंती उत्सव साजरा करण्यात यावा. आपले जे काही कार्यक्रम घेणार आहोत. त्याची माहिती पोलिसांना द्यावी त्याची रीतसर परवानगी दिली जाईल. महिला व मुलींना अडथळा होणार नाही असा बंदोबस्त तैनात केला जाईल. मिरवणुक मार्गाची पाहणी करण्यात येणार आहे. सोशल मीडिया चा वापर वाढला आहे. त्याचा गैरवापर होणार नाही याची काळजी घ्यावी. वादग्रस्त पोस्ट शेअर होणार नाही याची खबरदारी घ्यावी.असेही त्यांनी सांगितले. पो. नि. विनोद घुगे म्हणाले, जयंती साजरी करताना मूर्ती व प्रतिमा याची काळजी घेणे याची जबाबदारी मंडळाची आहे. कोणाचीही भावना दूखवेल असे कृत्य होणार नाही याची काळजी घ्यावी. डिजिटल संदर्भात नियमावली तयार करण्यात येणार आहे. गणेश उत्सवापासून डीजे बंद करण्यात आले आहे. पारंपरिक वाद्य वाजवून सण उत्सव साजरा करावा याबाबत त्यांनी सांगितले.

यावेळी तहसिलदार बाळूताई भागवत व मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी आपले मनोगत व्यक्त करत उत्सव एकोप्याने आनंदाने साजरा करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सचिन उबाळे यांनी जयंती उत्सवा दरम्यान गावातील दारू विक्री बंद करावी. ग्रामपंचायतच्या माध्यमातून मिरवणूक मार्ग खुला करून द्यावे. अशी मागणी केली. तर जवळा गावचे सरपंच सज्जन मागाडे यांनी जयंती उत्सवा दरम्यान ग्रामीण भागात आणि शहरी भागात अवैध धंदे बंद करावेत. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिस बंदोबस्त ठेवावा.अशी मागणी केली.

जयंती उत्सव मंडळाच्या सूचना येतील त्या सोडविल्या जातील. तसेच नगरपालिकेकडून सर्व सोयी सुविधा पुरवल्या जातील. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त जयंती उत्सव मंडळाने नगरपालिकेला १४ झाडांची वृक्षरोपे द्यावीत. ती वाढविण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. असे यावेळी नगराध्यक्ष आनंदाभाऊ माने यांनी सांगितले.

रवींद्र कांबळे यांनी सण जयंती उत्सवा दरम्यान नेहमी गोंधळ घालणाऱ्यावर आणि समाज कंठकावर तडीपारी किंवा जयंती उत्सव काळात कडक कारवाई करावी. अशी मागणी केली. एका गावात एकाच मंडळाला परवानगी द्यावी. तानाजीबापू बनसोडे यांनी मागणी केली.

दामोदर साठे यांनी यापूर्वी जयंती साठी परवानगी दिली त्या प्रमाणे आमच्या जयंती वेळी डॉल्बी साठी परवानगी द्यावी. ट्रॅफिक जाम होणार नाही याची दक्षता घ्यावी असे सांगितले. सतीश काटे यांनी नाझरा, चिनके, राजुरी गावातील परिस्थिती पुन्हा उद्भवणार नाही याबाबत दक्षता घेऊन प्रशासनाने लक्ष घालावे. अशी मागणी केली. यावेळी किशोर बनसोडे, दिपक होवाळ यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## जयहिंद (मा. सै.) नागरी सहकारी पतसंस्थेचे नवीन सभासदत्व देणे व शेअर्स विक्री १५ एप्रिल २०२६ अखेरपर्यंत सुरु



सांगोला : सहकार क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या जयहिंद (मा.सै.) नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सांगोला तालुका या संस्थेत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार शेअर्स धारण करण्याबाबतच्या अटी व शर्ती नमूद असून त्यानुसार संस्थेचे नवीन सभासदत्व देणे व नवीन शेअर्सची विक्री सुरू असून ती विक्री व सभासदत्व धारण करणे हे दिनांक १५ एप्रिल २०२६, अखेर सुरू राहणार असल्याची माहिती चेअरमन श्री.सोमेश यावलकर यांनी दिली.

तरी सभासदत्व घेण्यास व शेअर्स खरेदी करण्यास इच्छुक असणाऱ्या सर्व ग्राहकांनी संस्थेची नवीन सभासद होऊन शेअर्स विक्रीचा आवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे चेअरमन सोमेश यावलकर यांनी केले आहे.

तसेच याचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांनी आपले आधार कार्ड, पॅन कार्ड, ओळखपत्र, रेशन कार्ड झेरॉक्स व फोटो सोबत आणून केवायसीची पूर्तता करणे अत्यंत आवश्यक आहे. नवीन सभासद होण्यासाठी व शेअर्स खरेदी करण्यासाठी ३००० रुपये एवढी शेअर्स रक्कम, प्रवेश फी १०० रुपये, फॉर्म फी ६० रुपये, सेव्हिंग खाते १०० रुपये भरून आपली योग्य कागदपत्रे विहित नमुन्यातील अर्जासोबत जोडावीत व सभासद व्हावे, शेअर्स खरेदी करावेत, तसेच ज्या सभासदांची शेअर्स रक्कम ही ११०० रुपये आहे त्या सर्व सभासदांनी उर्वरित रक्कम भरून आपली शेअर्स रक्कम ३००० रूपये करून घ्यावी.

तसेच अधिकच्या माहितीसाठी ८४४६९५८००१ या नंबरवरती संपर्क साधावा असे आवाहन चेअरमन सोमेश यावलकर यांनी केले आहे.

## राजेवाडी तलावातून पाणी सोडण्यास सुरुवात आ.डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांना यश




सांगोला : उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना पाण्याअभावी शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. ऊस, मका, फळबागा तसेच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनल्याने शेतकरी चिंतेत होते. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्याकडे आपली व्यथा मांडली. परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर चर्चा करून गुरुवारी (दि. २ एप्रिल) सांगोला येथे तातडीची बैठक बोलावली होती. या बैठकीस फलटणचे मुख्य अधिकारी मोरे साहेब, डेप्युटी इंजिनिअर धोत्रे, नवले तसेच लाभधारक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीदरम्यान आमदार देशमुख यांनी राजेवाडी तलाव व निरा उजवा कालवा येथील पाणीसाठ्याची स्थिती जाणून घेतली. शेतकऱ्यांच्या अडचणी व जनावरांच्या चाऱ्याची समस्या लक्षात घेऊन तात्काळ पाणी सोडण्याची मागणी त्यांनी अधिकाऱ्यांकडे केली. त्यांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत अधिकाऱ्यांनी तत्काळ निर्णय घेत राजेवाडी तलावातून कालव्यात पाणी सोडण्याचे आदेश दिले.

आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे त्वरित पाणी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करत त्यांचे कौतुक केले तसेच अधिकाऱ्यांचे आभार मानले.

या बैठकीस दीपक गोडसे, शेतकरी कामगार पक्षाचे नेते मोहन आलदर, ॲड. विजय खरात, ज्येष्ठ नेते संजय (मामा) गोडसे, सांगोला औद्योगिक वसाहतीचे व्हाईस चेअरमन नितीन नरळे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाची माहिती प्रसिद्धी प्रमुख चंद्रकांत सरतापे यांनी दिली.

## सांगोला वनविभागात प्राण्यांसाठी ४८ पाणवठ्यांची निर्मिती! उन्हाच्या झळांनी वन्यजीव हैराण



सांगोला : वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे सांगोला तालुक्यातील वनपरिक्षेत्रातील वन्यजीव अक्षरशः जीव मुठीत धरून जगत आहेत. उन्हाची तीव्रता वाढल्याने पाण्याच्या टंचाईचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून, वनविभागाने ४८ पाणवठ्यांची निर्मिती केली असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी सागर मगर यांनी दिली.

सांगोला तालुक्यात तब्बल ६५०० हेक्टर क्षेत्रावर पसरलेल्या वनपरिक्षेत्रात लांडगा, कोल्हा, तरस, सांबर, हरिण, काळवीट यांसारख्या दुर्मिळ व महत्त्वाच्या प्रजातींचा वावर आहे. या प्राण्यांच्या अस्तित्वासाठी पाण्याची उपलब्धता अत्यंत गरजेची असताना, उन्हाच्या चटक्यांमुळे नैसर्गिक जलस्रोत आटत चालले आहेत. यावर तोडगा म्हणून वन विभागाने ४८ कृत्रिम पाणवठ्यांची निर्मिती केली असून, दर १५ दिवसांनी टँकरद्वारे पाणी सोडले जात आहे.

मात्र, वाढत्या तापमानामुळे हे पाणी लवकर आटत असल्याने वन्यजीवांना पुरेसा दिलासा मिळत नसल्याचे चित्र आहे. तालुक्यातील आलेगाव, अचकदाणी, कटफळ, महूद, राजुरी, हटकर मंगेवाडी या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात वनक्षेत्र असून, येथे वन्यजीवांची संख्या लक्षणीय आहे.

या संपूर्ण भागावर लक्ष ठेवण्यासाठी २२ वन कर्मचारी कार्यरत आहेत. दरम्यान, स्थानिक नागरिकांकडूनही चिंता व्यक्त होत असून, पाण्याअभावी वन्यजीव गावांकडे वळण्याची शक्यता वाढत आहे. वन विभागाने केलेल्या उपाययोजना स्तुत्य असल्या तरी, वाढत्या उष्णतेसमोर त्या अपुऱ्या ठरत आहेत.

अधिक टँकर, कायमस्वरूपी जलस्रोत निर्माण, तसेच वन्यजीवांसाठी दीर्घकालीन नियोजनाची गरज आता प्रकर्षाने जाणवत आहे.